<u>उलटतपास वादीतर्फे श्री. डी.ए.साबने वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>

**९.** मी बारावीपर्यंत शिकलो आहे. मी माझ्या पत्नीविरुध्द तिने माझ्याकडे नांदावयला यावे म्हणून अर्ज केला आहे. त्याशिवाय माझे प्रकरण न्यायालयात नाही. मोहनराव यांच्या वडीलांचे नाव जयवंतराव आहे. जयवंतराव यांना दोन पत्नी होत्या. एकीचे नाव लक्ष्मीबाई, दुसरीचे नाव मला माहिती नाही. लक्ष्मीबाई यांना मोहनराव हा एकच मुलगा आहे. दुस-या पत्नीला दोन मुले होती. मोरेवाडी व खरबवाडी माझे पाहुणे आहेत. दोन्ही गावांमध्ये मिळून माझे १० ते १२ पाहुणे आहेत. गावातील लग्नकार्याला संपूर्ण गावातील लोक येतात, यास माझे सांगणे की, साधारणपणे २५ टक्के लोक लग्नाला येतात. मोहनराव व जनाबाई यांचे लग्न मी प्रत्यक्ष पाहिले नाही. जनाबाईचा शाळा निर्गम उतारा किंवा ग्रामपंचायतीचा जन्मदाखला मी पाहिला नाही. जनाबाईचा जन्म झाला तेव्हा मी जन्मलो नव्हतो. १९६५ साली माझा जन्म नव्हता. १९७२ सालापर्यंत मोहनराव जगतापपासून जनाबाईला कोणतेही अपत्य झाले नाही हे मी स्वत: पाहिलेले आहे. माझा जन्म १९७० सालातील आहे. हे खरे की, १९७२ साली मी दोन वर्षाचा होतो. दोन वर्षाच्या बाळाला कोण कोणाची पत्नी आहे, कोणाला लेकरबाळ झाली हे समजत. हे खरे नाही की, १९७२ सालापर्यत जनाबाईला मोहनरावपासून मुलबाळ झाले नाही हे मी खोटे लिहीले आहे. १९७२ मध्ये अनुसयासोबत मोहनराव यांनी दुसरे बेकायदेशीरपणे लग्न केले हे मला माहिती नाही, यास माझे सांगणे की मी दुस-याच्या सांगण्यावरुन सांगितले आहे. सदर बाब मला दुस-याने सांगितली असे माझ्या सरतपासात लिहीलेले नाही हे खरे आहे. अनुसयाबाईचा मयत मोहनराव जगताप यांच्या मिळणा-या पेन्शनशी काहीही अधिकार नाही असे सांगणारा कायदा कोणता हे मला आठवत नाही. मी सांगतो की, मोहनरावने त्यांच्या कायदेशीर पत्नीचे नाव लावले म्हणून तिला पेन्शन मिळते. सदर बाब मला दुस-याने सांगितली यास माझे सांगणे की, मला मोहनरावने सांगितले. अनुसयाबाई यांना मंगेश नावाचा मुलगा १८/०२/१९७३ रोजी जन्माला आला हे मला माहिती नाही हे खरे नाही. मंगेशचा जन्म औरंगाबाद येथे झाला. तो दवाखान्यात झाला की, घरी झाला हे मला माहिती नाही. त्याचा जन्मदाखला मी पाहिलेला नाही.

**१०.** वादी अनुसयाबाई हिचा जन्मदाखला मी पाहिलेला आहे. अनुसयाबाईचा शाळा सोडल्याचा उतारा मी दाखल करु शकतो कारण तो मी पाहिलेला आहे. हे खरे नाही

की, १९६३ साली अनुसयाबाईचा विवाह झालेला नाही असे हे मी प्रत्यक्ष पाहिलेला नाही. अनुसयाबाईचे लग्न १९६३ साली झाले व तिचे वय ६२ वर्षे आहे असे मी सरतपासात जे लिहीले आहे ते मी प्रत्यक्ष पाहिलेले नाही हे म्हणणे खरे आहे.

**११.** जनाबाई व मोहनराव यांच्याकडे राहून १९८० साली इयत्ता ५वी च्या वर्गात असताना मी शिक्षण घेतले यास त्यांच्याकडे राहत असल्याबद्दलचा भाडेकरार माझ्याकडे नाही हे खरे नाही. मी पुन्हा सांगतो की, माझ्याकडे भाडेकरार नाही. जनाबाईची सून लता ही माझी बहीण आहे.

कोर्ट प्रश्न - तुमचे आणि मोहनराव यांचे नाते काय आहे ?

उत्तर - मोहनरावचे आजोबा बापूराव यांची आत्या माझे वडीलांचे आजोबा झुंटीकराव पाटील यांची पत्नी होती त्यामुळे माझे पुर्वीपासूनचे नाते आहे.

**१२.** बापूरावांच्या आत्यांचे नाव सुलोचना आहे. सुलोचना माझ्या वडीलांची आजी आहे. त्यांचे नातेसंबंध दर्शविणारी शिधापत्रिका माझ्याकडे नाही. हे खरे नाही की, त्यांचे आणि माझे नाते आहे असे मी खोटे सांगतो. हे खरे की, लताच्या पतीचे नाव बाजीराव आहे. हे खरे की, बाजीराव हा जनाबाईचा मुलगा आहे. हे खरे नाही की, आमच्या बाजूने साक्ष कोणीच तयार नाही असे लताने मला सांगितले म्हणून मी साक्षीला आलो. खरबवाडी, मोरेवाडी येथून कोणीच साक्ष दयायला तयार नाही म्हणून मी त्यांच्या बाजूने साक्ष दयायला आलो हे खरे नाही. हे खरे नाही, माझा सरतपास खोटा आहे. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/
**( एस.एन.सरडे )**
दिनांक ३०/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अहमदपूर